थनयमित दिवाणी दावा क्र.३९३/२०२३ मधील निशाणी ५२ वरील आदेश

**रूपाली व इतर विरूध्द बेगम व इतरण**

## CNR NO.MHLA0600081023

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी स्थळ पाहणी करून वस्तुस्थिती दाखवणारा नकाशा दाखल करण्याकामी न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्याकरीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. अर्ज, त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

३. वादीचे अर्जातील थोडक्यात कथन की, दाव्यातील सत्य शोधण्याकरीता वादग्रस्त बाबीवर अधिक प्रकाश टाकण्यासाठी स्थानिक अन्वेषण होणे आवश्यक आहे. त्यांच्या अहवालावर नकाशा आल्यानंतर या न्यायालयास निर्णय देणे सोयीस्कर होणार आहे. वादग्रस्त सर्वे नं.३९/१ व ४०/२ च्या सामाईक बांधावरून पुर्वेकडे प्रतिवादी यांच्या वहिवाटीचा रस्ता आहे काय किंवा त्याठिकाणची वस्तुस्थिती याकरीता कच्च्या नकाशात नमूद केल्याप्रमाणे सर्व प्रतिवादींना मौजे बेलुर वसाहतीपासून सर्वे नं.३९/४ व ४०/४ कडे जाणारा माळेगाव रस्ता उपलब्ध आहे काय व तो अस्तित्वात आहे काय, अहमदपूर ते बेलूर सडकेलगत पुर्वेकडे प्रतिवादी क्र.३ व ४ ची सर्वे नं.४०/१ मधे लगत जमिन आहे काय व रस्ता आहे काय तसेच प्रतिवादी क्र.३, ४, ७ व ९ यांना त्यांच्या सर्वे नं.४०/१, ४०/३, ४०/४ या जमिनीस तळेगाव बेलूर शिव हददीवरून महादेववाडीकडे वाहतुकीसाठी रस्ता अस्तित्वात आहे काय याबाबत अन्वेषण होवून वस्तुस्थिती अहवाल नकाशासह न्यायालयात येणे आवश्यक आहे. सबब, त्यांनी स्थानिक अन्वेषणाकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करण्याची मागणी केली आहे.

४. प्रतिवादी यांनी अर्जास प्रतिकार करून तो नामंजूर करण्याची विनंती केली.

५. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

६. वादी यांनी दाव्यात त्यांनी मामलतदार कोर्ट ॲक्ट चे कलम ५ अन्वये मा. तहसिलदार, अहमदपूर यांच्यासमोर संचिका क्र.२२३—जमा—२—कावि—६१ अर्ज दाखल केल्याचे व तो स्थळ पाहणी, अभिलेख तपासणी व सुनावणी घेवून नामंजूर केलेला असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी देखील ती बाब त्यांच्या लेखी कैफियत निशाणी २८ मध्ये नाकारलेली नाही. वादी यांनी तहसिलदार यांचा वरील नमूद आदेश यादी निशाणी

५ सोबत दाखल केलेला आहे. ज्यामध्ये तहसिलदार यांनी तो अर्ज निर्णीत करताना स्थळ पाहणी केल्याचे नमूद आहे. असे असताना पुन्हा त्याच कारणाकरीता न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक करणे हे निरर्थक वेळ काढूपणाचे होईल. तसेच वादी यांनी न्यायालयीन आयुक्त म्हणून कोणाची नेमणुक करणे अपेक्षीत आहे याची स्पष्टता अर्जात केलेली नाही. याकारणास्तव अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारित करते.

**आदेश**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2026.06.19 17:56:43 +0530

दि.१९.०६.२०२६

**(स्वानंदी दे. वडगांवकर)**

सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अहमदपूर